# सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांसाठी विशेष केंद्र

## मुकुल माधव फाऊंडेशनचा उपक्रम

**पुणे । प्रतिनिधी**

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सर्वंकष आधार पुरविण्याच्या उद्देशाने मुकुल माधव फाऊंडेशन साताऱ्यातील रुबी हॉल हेल्थ केअर सर्व्हिसेस येथे विशेष सल्लाकेंद्र उघडणार आहे. येथे या मुलांना दूर-पुनर्वसन कार्यक्रमाचे लाभ घेता येतील तसेच केईएम रुग्णालय, पुणे येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे मिळविता येईल. बालमेंदू तज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञां सारख्या तज्ञांची उणीव पूर्ण करण्यास यामुळे मदत होईल, अशी घोषणा मुकुल माधव फाऊंडेशनच्या व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया यांनी शुक्रवारी केली. ही जागा मोफत उपलब्ध करून देणारे रुबी हॉलचे डॉ. परवेज ग्रँट आणि या उपक्रमात सहकार्य करणारे डॉ.




भारती पाटील यांनी प्रतिनिधित्व केलेल्या केईएम रुग्णालयाचे डॉ. आनंद पंडित यांचे एमएमएफ आभार मानू इच्छिते.

सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना सेरेब्रल पाल्सी खुर्च्या, व्हीलचेअर आणि कमोड चेयरच्या वितरणप्रसंगी साताऱ्यात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. साताऱ्याचे जिल्हाधिकारी श्री. अश्विन मुदगल,सातारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.नितीन पाटील, पुणे विभागाचे अतिरिक्त आयुक्त शाम देशपांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी श्री.दिलीप माने, जिल्हा शिक्षण अधिकारी सौ. पुनिता गुरव, कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे व्यवस्थापकीय संचालक श्री. फारोख कूपर आणि कूपर कॉर्पोरेशन प्रा. लि. चे सीईओ श्री. झाल कूपर, रुबी हॉल क्लिनीकचे डॉ. परवेज ग्रँट आणि केईएम इस्पितळाच्या भारती पाटील यावेळी उपस्थित होते.साताऱ्याचे छत्रपती खा. उदयनराजे भोसले आणि त्यांच्या पत्नी छत्रपती दमयंतीराजे भोसले यांची उपस्थिती हे या सोहळ्याचे आणखी एक आकर्षण ठरले. या खुर्च्या फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. ची सीएसआर शाखा असलेल्या मुकुल माधव फाऊंडेशनच्या वतीने भेट देण्यात आल्या. या कार्यक्रमात एकूण पाच व्हिलचेयर्स, पाच कमोड व्हिलचेयर्स आणि एक सेरेब्रल पाल्सी खुर्ची देण्यात आली. मुकुल माधव फाऊंडेशनने सातारा जिल्ह्यातील सेरेब्रल पाल्सीग्रस्त मुलांना आतापर्यंत ७४ व्हिलचेयर्स आणि ५२ कमोड खुर्च्या भेट दिल्या आहेत.